MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३२/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. भगवान सादू मोरे,<br>उदगांव वेस, त्रिमुर्ती निवास,<br>मिरज, ता. मिरज, जि. सांगली. | अपेलंट |

**<u>विरूध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ,<br>सांगली.<br><br>३) उपकार्यकारी अभियंता (संवसु).<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग, मिरज, ता.मिरज, जि. सांगली<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :-** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. भगवान सादू मोरे, रा. मिरज, जिल्हा–सांगली यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली येथे विहित नमुन्यांत चुकीच्या वीज बिलाबाबत तक्रार नोंदविली होती. त्याकामी कक्षाने दिनांक १०–७–२००७ रोजी दिलेला निर्णय मान्य न झाल्यांने त्यांनी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

ग्राहकाची प्रमुख तक्रार अशी की त्यांनी दि. १०–६–२००६ रोजी तक्रार करून व मीटर तपासणी चार्जेस भरूनही मीटर बदलण्यास वि.प. यांनी ६ महिन्याचा कालावधी लावला. तसेच एकदा ५४ युनिटचा वापर केल्यानुसार वीज बील आकारले आहे. मात्र दुस–या बिलाचेवेळी ११५८ वापर केल्याचे दाखवून रू. ५५७०/– रकमेची आकारणी करण्यांत आली आहे. ती त्यांना मान्य नाही. सबब त्यांना वीज बील दुरूस्त करून मिळावे. तसेच याकामी त्यांना झालेल्या मानसिक, शारीरिक त्रासाबद्दल रू. २५०००/– नुकसान भरपाई मिळावी.

प्रकरणी सुनावणीची तारीख १०–९–२००७ रोजी नेमली होती. सदरचे दिवशी मुंबई हायकोर्टात निवडणूक याचिकेच्या संदर्भात हजर राहणार असल्याचे श्री. मोरे यांनी मंचास कळविल्यावरून सुनावणीची पुढील तारीख १४–९–२००७ रोजी ठेवली. सदरचेवेळी ग्राहकाचेवतीने श्री. शामराव सादू मोरे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीचे काम पूर्ण होईपर्यंत आपण अर्जदार असल्याचे भासविले व शेवटी प्रतिनिधी म्हणून उपस्थित असल्याचे सांगितले. वि.प. यांचेवतीने श्री. सावंत, उपकार्यकारी अभियंता, मिरज, श्री. मेहता, सहाय्यक अभियंता, मिरज व श्री. शिंदे, कनिष्ठ अभियंता, मिरज हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी श्री.शामराव मोरे यांनी अनुसूची ”अ” सोबत जोडलेल्या निवेदना प्रमाणे सविस्तर कथन केले. त्यांचे म्हणणे असे की ग्राहकाने दि. १०–६–२००६ रोजी मीटर फास्ट असल्याची तक्रार केली होती. तसेच मीटर तपासणी चार्जेस रू. ६०/–दि. १२–६–२००६ रोजी वि.प.कडे भरणा केले होते. तथापि त्यांना मीटर दुरूस्त होऊन मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी हरकत नोंदवून रू. ५०००/– वीज बिलापोटी भरले. त्यानंतरही त्यांनी वेळोवेळी हरकत नोंदवून विजेची रक्कम भरणा केली आहे. पुढे त्यांनी असे सांगितले की दि. १५–१२–२००५ ते १४–२–२००६ या कालावधीचे बिलामध्ये ५४ युनिटचा वापर केल्याचे दाखवून वि.प.ने आकारणी केली आहे. मात्र दि. १५–२–२००६ ते १४–४–२००६ या कालावधीचे बिलामध्ये ११५८ युनिटचा वापर केल्याचे दाखवून त्यांचेवर रू. ५५७०/– ची आकारणी केली आहे. सदरची आकारणी अन्यायकारक असल्याने त्या रकमेचा त्यांनी भरणा केलेला नाही. त्यामुळे वि.प.चे वतीने दि. १०–११–२००६ रोजी वीज पुरवठा खंडित करण्यासाठी वायरमन पाठविण्यात आला. याचा मानसिक त्रास ग्राहकास झाला आहे. त्यापोटी त्यांना रू. २५,०००/– नुकसान भरपाई मिळावी तसेच वीज बील दुरूस्त करून मिळावे असे त्यांनी शेवटी सांगितले.

वि.प. यांचे वतीने श्री. मेहता, सहाय्यक अभियंता, मिरज यांनी असे सांगितले की ग्राहकाने तक्रार केल्यानंतर मीटर बदलण्यास तसेच त्याची तपासणी करण्यास अपरिहार्य कारणामुळे विलंब झाला आहे. मात्र चांचणी अहवालानुसार मीटर सुस्थितीत तसेच सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे. या चांचणी अहवालाची प्रत ग्राहकास देण्यात आली होती. मात्र त्याची पोंच घेण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. श्री. मेहता यांनी तक्रारदार यांना फेब्रुवारी २००६ मध्ये ५४ युनिटचे व एप्रिल २००६ मध्ये ११५८ युनिटचे बील दिल्याचे मान्य केले. त्यांनी पुढे असे सांगितले की C.P.L. प्रमाणे ग्राहकाचा मासीक वीज वापर हा सरासरी ३०० ते ३५० युनिट्सचा आहे. ही वस्तुस्थिती विचारांत घेता ग्राहकास फेब्रुवारी २००६ व एप्रिल २००६ मध्ये दिलेल्या चार महिन्याच्या वीज बिलातील एकूण युनिट्स संख्या १२१२ एवढी येते. ग्राहकास फेब्रुवारी २००६ मध्ये कमी युनिटचे (५४ युनिट्स) बील देण्यात आल्यामुळे व एप्रिल २००६ मध्ये एकदम ११५८ युनिट्सचे बील दिल्यामुळे त्यांना फेब्रुवारी २००६ चे बिलामध्ये टॅरिफनुसार स्लॅबचा फायदा मिळालेला नाही. सदरचा लाभ देणे आवश्यक

असल्यामुळे तो पुढील बिलामध्ये देण्यांत येईल. श्री. मेहता यांनी पुढे असेही सांगितले की डिसेंबर २००६ मध्ये बसविलेल्या नवीन मीटर प्रमाणे देखील ग्राहकाचा मासीक वापर सरासरीने ३२५ ते ३५० युनिट्स येतो. यावरून ग्राहकाची तक्रार वस्तुस्थितीस धरून नसल्याचे त्यांनी सांगितले. श्री. भगवान सादू मोरे या प्रस्तुतच्या ग्राहकावर सन २००३ मध्ये वीज चोरी केल्याबद्दल भरारी पथक, विश्रामबाग, सांगली यांनी मिरज शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच जून २००७ मध्ये वीज चोरी पोटी ११५६ युनिट्सचे रू. १०९७०/– चे वीज बील तसेच कंम्पाऊंडींग रक्कम रू. २०,०००/– आकारून ती भरण्यासाठी ग्राहकास नोटीस दिली होती. त्यापैकी ग्राहकाने दि. १९–६–२००७ रोजी रू. १०९७०/– चा भरणा केला आहे व उर्वरीत कंम्पाऊंडींग चार्जेस रू. २०,०००/– भरण्यासाठी मुदत दिलेली होती. त्या मुदतींत त्यांनी रक्कमेचा भरणा न केल्यामुळे त्यांचे विरूध्द वीज चोरीचा गुन्हा मिरज शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केला आहे. श्री मोरे यांनी वि.प. यांचे विरूध्द केलेल्या अन्य तक्रारी निरर्थक तसेच निराधार असल्याचे श्री. मेहता यांनी सांगून ग्राहकाची वीज बील दुरूस्तीची विनंती तसेच नुकसान भरपाईची विनंती फेटाळण्यांत यावी अशी मंचास विनंती केली.

सुनावणीचेवेळी अपीलदार व वि.प. यांचेवतीने केलेले कथन व उपलब्ध कगदपत्रे यावरून प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

श्री. भगवान सादू मोरे, रा. मिरज, यांनी दि. १०–६–२००६ रोजी घरगुती वापराचे मीटर फास्ट असल्याची तक्रार वि.प.कडे केली होती. त्यानंतर त्यांनी मीटर तपासणी फी रू. ६०/– दि. १२–६–२००६ रोजी वि.प.कडे भरणा केली. तथापि वि.प. यांचकडून डिसेंबर २००६ पर्यत मीटर तपासणीस विलंब लागला. मीटर चाचणी अहवाल पहातां मीटर सुस्थितीत तसेच निर्दोष असल्याचे दिसून येते. तरीसुध्दा ग्राहकाची तक्रार ही मिटरचे तपासणीस सुमारे ६ महिन्याचा विलंब लागल्यापर्यंत योग्य तसेच वाजवी वाटते. वास्तविक पहातां महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतूदीनुसार वि.प. यांनी विहीत मुदतीत मीटरची तपासणी करून त्याच्या अहवालाची प्रत ग्राहकास देणे आवश्यक आहे. तसे या प्रकरणी झाल्याचे दिसून येत नाही. या त्रुटीबाबत वि.प. यांनी दि. ७–९–२००७ चे निवेदनामध्ये केलेल्या खुलाशावरून सदरचा विलंब अपरिहार्य कारणामुळे झाल्याचे दिसून येते. फेब्रुवारी २००६ ते एप्रिल २००६ या चार महिन्याच्या कालावधीपैकी पहिल्या दोन महिन्याच्या कालावधीचे ५४ युनिटचे बील आकारल्याचे व उर्वरीत दोन महिन्याच्या कालावधीसाठी ११५८ युनिटचे बील आकारल्याचे श्री. मेहता, सहाय्यक अभियंता, मिरज यांनी मान्य केले. त्यावेळी त्यांनी असेही सांगितले की C.P.L. प्रमाणे ग्राहकाचा मासीक वीज वापर हा सरासरी ३०० ते ३५० युनिट्सचा आहे. त्याचे पृष्टर्थ श्री. मेहता यांनी C.P.L. तक्ता मंचाचे अवलोकनासाठी सादर केला. त्यावरून वि.प. यांनी सांगितलेली वस्तुस्थिति खरी असल्याची मंचाची धारणा आहे. फेब्रुवारी २००६ मध्ये ग्राहकास ५४ युनिट्सचे बील मीटर रिडींग न घेतां दिल्याचे दिसून येते. मात्र एप्रिल २००६ मध्ये मीटर रिडींग (Progressive) घेऊन ११५८ युनिट्सचे बील दिल्याचे दिसून येते. चार महिन्याचे कालावधीमध्ये केलेला १२१२ युनिट्सचा वापर हा C.P.L. मध्ये नमूद असलेल्या सरासरीप्रमाणे वाटतो. अवाजवी वाटत नाही. ग्राहकास फेब्रुवारी २००६ मध्ये कमी युनिटचे म्हणजे ५४ युनिट्सचे बील देण्यांत आल्यामुळे व एप्रिल २००६ मध्ये एकदम ११५८ युनिट्सचे बील दिल्यामुळे त्यांना फेब्रुवारी २००६ चे बिलामध्ये टॅरिफनुसार स्लॅब्चा फायदा मिळालेला नाही. सदरचा लाभ देणे आवश्यक असल्याने तो पुढील बिलामध्ये देण्यांत येत असल्याचे श्री. मेहता, सहाय्यक अभियंता, मिरज यांनी सांगितले. त्यानुसार चुकीच्या बिलाबाबत ग्राहकाने केलेल्या वाजवी तक्रारीचे

निवारण होण्यास हरकत नाही. याठिकाणी मंचास असे नमूद करावेसे वाटते की फेब्रुवारी २००६ मध्ये ५४ युनिट्सचे बील मिळाल्याचेवेळी ग्राहकास त्याविषयी शंका आली नाही. मात्र एप्रिल २००६ मध्ये ११५८ युनिट्स बील मिळाल्याबरोबर चुकीच्या बिलाविषयी लागलीच तक्रार करण्याचे समजते. यामागचे तर्कशास्त्र आकलन होत नाही. उपकार्यकारी अभियंता यांनी दि १२-६-२००७ रोजी ग्राहकाचे विद्युत संचाची तपासणी केली असतां त्यांचा जोडलेला विद्युत भार ३.४५२ के.डब्ल्यू. असल्याचे दिसून आले आहे. सदरचे वेळी ग्राहक श्री. भगवान मोरे ही स्वत: उपस्थित होते व त्याची प्रत त्यांना दिली आहे. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री शामराव मोरे यांचे निदर्शनास मंचाने ही बाब आणून दिली असतां त्याबाबत बोलण्याचे त्यांनी सोईस्करपणे टाळले. यावरून सोयीचे तेवढे ठामपणे मांडावयाचे व गैरसोईचे होते आहे असे दिसल्यास टाळाटाळ करायची असा एकंदरीत ग्राहकाचा कल असल्याचे मंचाचे निदर्शनास आले आहे. त्याचाच भाग म्हणून फेब्रुवारी २००६ मध्ये दिलेल्या ५४ युनिट्सचे बील मान्य करावयाचे व एप्रिल २००६ मध्ये ११५८ युनिट्सचे बील मिळाल्याबरोबर अन्याय झाल्याची ओरड करावयाची याकडे अंगुली निर्देश करतां येईल. याच पार्श्वभूमीवर सदरचे ग्राहका विरूध्द सन २००३ मध्ये व जून २००७ मध्ये वीज चोरीबाबत वि.प. ने दाखल केलेले मिरज शहर पोलीस ठाण्यांतील गुन्हे अतिशय बोलके वाटतात. वरील विवेचनावरून श्री. भगवान मोरे यांची मिटरबाबतची तसेच चुकीच्या वीज बिलाबाबतची तक्रार निरर्थक वाटते. त्यास अनुसरून मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. श्री. भगवान सादू मोरे यांनी दि. १६-८-२००७ रोजी मंचामध्ये दाखल केलेली तक्रार फेटाळण्यात आली आहे.
२. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( के. व्ही. पाटील )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर